# इंदिरा महिला सहकारी बँक लि., मालेगांव

आर.बी.एच. कन्या विद्यालय समोर, कॉलेज रोड मालेगांव कॅम्प-४२३१०५ जि. नाशिक

३० वार्षिक अहवाल

रजि.नं.: एन्.एस.के./ एम्.एल.जी/बी/एन्.के/ओ १५४२/९६ | रिझर्व्ह बँक लायसेन्स् नं.: यु.बी.डी/१३५२ पी/९७

## "३० व्या" अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त भागधारकांकरिता)

सन्माननीय सभासद बंधु व भगिनी,

आपणांस कळविण्यात येते की, **इंदिरा महिला सहकारी बँक लि., मालेगांव** या बँकेची **३० व्या** वर्षाची सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक शनिवार दिनांक : १२.०९.२०२६ रोजी सकाळी ठिक : ११.०० वाजता चेअरमन **सौ. गितांजलीताई प्रसाद हिरे** यांच्या अध्यक्षतेखाली **" शांताई हॉल " सटाणा रोड, मधुबन हॉटेल समोर, रेणुका लॉन्सच्या बाजुला, दाभाडी रोड, मालेगांव, जि. नाशिक** येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजीत केली आहे. तरी कृपया सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**:: विषय पत्रिका ::**

**विषय क्र. १.** शनिवार २९ सप्टे. २०२५ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या वार्षीक बैठकीचे इतिवृत वाचून कायम करणे.

**विषय क्र. २.** संचालक मंडळाने सादर केलेला दि.: ३१.०३.२०२६ अखेरचा वर्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचून स्विकृत करणे.

**विषय क्र. ३.** सन २०२४-२०२५ च्या वैधानीक लेखा परिक्षण दोष दुरुस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे.

**विषय क्र. ४.** दि.: ३१-०३-२०२६ अखेरच्या वैधानीक लेखा परिक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.

**विषय क्र. ५.** संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि.: ३१-०३-२०२६ अखेरच्या नफा वाटणीस रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीने मंजूरी देणे बाबत विचार करणे.

**विषय क्र. ६.** सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केले ल्या अंदाज पत्रकास व सन २०२५-२०२६ च्या अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

**विषय क्र. ७.** सन २०२६-२०२७ या वर्षा साठी वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व त्याबाबत शासनाच्या नियमा प्रमाणे मेहनताना अदा करण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे बाबत.

**विषय क्र. ८.** अंर्तगतलेखा परिक्षक नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

**विषय क्र. ९.** वार्षिक सर्व साधारण सभेस उपस्थित राहु न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

**विषय क्र. १०.** मा. अध्यक्षांच्या परवानगीने ठेवण्यात येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**- मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन -**

**श्री. एस. पी. पाखले**
जनरल मॅनेजर

**सौ. मनिषा संदिप शिरसाठ**
व्हा. चेअरमन

दिनांक : २८.०८.२०२६

**सूचना :**

१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सदरची सभा त्या दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तासाने सुरु करण्यात येईल, अशा सभेस कोरम ची आवश्यकता राहणार नाही.

२) बँकेचा सन २०२५-२०२६ अखेरचा सरकारी तपासणी अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात पहावयास मिळेल.

३) आपल्या बँकेच्या कामकाजाबाबत काही सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात दिनांक : ०७.०९.२०२६ पर्यंत मुख्य कार्यालयात आणुन द्याव्यात अथवा पोस्टाने वेळेत पाठवाव्यात.

४) या सभेची नोटीस बँकेच्या सर्व शाखांमध्ये लावण्यांत आलेली आहे. तसेच वार्षिक अहवालाच्या प्रति वाचण्यासाठी ठेवण्यांत आलेल्या आहेत.